23 FEB 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निवडणुकीत भ्रष्टाचारी प्रवृत्तीविरोधात चिंतन हवे

## शेखर चन्ने : विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात एकदिवसीय चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २२ : 'लोकशाही निवडणूक प्रक्रियेत मतदारांना वस्तू समजून त्यांची किंमत लावणाऱ्या भ्रष्टाचारी प्रवृत्ती रोखण्यासाठी जनजागृतीबरोबरच समाजातील बुद्धिवंतांकडूनही सखोल चिंतन होणे आवश्यक आहे', असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने यांनी आज केले. शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने 'निवडणुकांतील आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे' या विषयावर झालेल्या एकदिवसीय चर्चासत्रात बोलत होते. सामाजिक शास्त्रे विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील अध्यक्षस्थानी होत्या.

दरम्यान, विद्यापीठ प्रांगणातून निवडणूक प्रबोधन रॅली काढली. श्री. चन्ने यांच्या हस्ते रॅलीचे उद्‍घाटन झाले. रॅलीत विद्यापीठातील तसेच महाविद्यालयीन राज्यशास्त्र अधिविभागातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

श्री. चन्ने म्हणाले, "निवडणुकांत उमेदवारांकडून बळाचा (मसल पॉवर) आणि पैशांचा (मनी पॉवर) वापरण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत गेले. पोलिस प्रशासनाच्या सहकार्याने बळाचा वापर रोखण्यात आयोगाला यश आले. मात्र पैशाचा गैरवापर, प्रभाव आणि दबाव कमी करण्यात अपेक्षेइतके यश आलेले नाही. उमेदवारांकडून मतदारांना भुरळ पाडण्यासाठी विविध क्लृप्त्या लढविल्या जातात. विविध प्रलोभने, आडमार्गाने भेटवस्तू, जेवणावळी असे यंत्रणेच्या डोळ्यांत धूळफेक करणारे अप्रत्यक्षपणे पैसा मुरविण्यासाठी अवलंबतात. या प्रवृत्तींमुळे लोकशाहीत प्रत्येक व्यक्तीला जसा मतदानाचा अधिकार असला, तरी निवडणूक लढविण्याची समान संधी मात्र उपलब्ध होऊ शकत नाही. पैशाचा गैरवापर या समान संधीच्या आड येतो. यासाठी जबाबदार समाजघटकांनी मतदारांचे प्रबोधन करण्यावर भर द्यावा. निवडणूक प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी निवडणूक आयोग सातत्याने प्रयत्नशील आहे. कागदी मतपत्रिकांपासून सुरू झालेला मतदान प्रक्रियेचा प्रवास तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आपण ईव्हीएम यंत्रांपर्यंत केला. त्यापुढे जाऊन व्हीव्ही - पॅट यंत्रणेपर्यंत आपण पोहोचलो आहोत. पण सक्षम लोकशाहीसाठी मतदारांनी स्वतःहून भ्रष्टाचार रोखण्यासाठी पावले उचलली पाहिजेत." त्याचप्रमाणे अशा चर्चासत्रांच्या माध्यमातून आपण काही तंत्रज्ञानात्मक उपाय देऊ शकू का, याविषयीही चिंतन होण्याची गरज असल्याचे ही श्री. चन्ने यांनी नमूद केले. डॉ. भारती पाटील यां मनोगत व्यक्त केले. राज्यशा अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रवींद्र भण यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी झालेल्या निवडणूकविषयक एकदिवसीय चर्चासत्रात बोलताना राज निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने. व्यासपीठावर डावीकडून डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, ड रवींद्र भणगे.**

2 3 FEB 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निवडणुकांतील भ्रष्टाचार रोखण्यासाठी चिंतन आवश्यक

## निवडणूक आयोग सचिव शेखर चन्ने : शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात निवडणूक प्रबोधन रॅली

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

लोकशाही निवडणूक प्रक्रियेत मतदारांना वस्तू समजून त्यांची किंमत लावणाऱ्या भ्रष्टाचारी प्रवृत्ती रोखण्यासाठी जनजागृतीबरोबरच समाजातील बुद्धिवंतांकडूनही सखोल चिंतन होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने यांनी गुरुवारी सकाळी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांच्या वतीने 'निवडणुकांतील आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे'या विषयावर आयोजित एकदिवसीय चर्चासत्राचे उद्घाटन चन्ने यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. मानव्यविद्या सभागृहात झालेल्या या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी सामाजिक शास्त्रे विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील होत्या.

चन्ने म्हणाले, निवडणुकांमध्ये उमेदवारांकडून बळाचा (मसल-पॉवर) आणि पैशांचा (मनी पॉवर) वापरण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत गेले. परंतु पोलिस प्रशासनाच्या सहकार्याने बळाचा वापर रोखण्यात आयोगाला यश आले. मात्र, पैशाचा गैरवापर, प्रभाव आणि दबाव कमी करण्यात अद्याप अपेक्षेइतके यश मिळालेले नाही. याचे कारण असे की, उमेदवारांकडून मतदारांना भुरळ पाडण्यासाठी विविध क्लृप्त्या लढविल्या जात असतात. विविध प्रलोभने, आडमार्गाने भेटवस्तू, जेवणावळी असे यंत्रणेच्या डोळ्यांत धूळफेक करणारे अप्रत्यक्ष मार्ग पैसा मुरविण्यासाठी अवलंबले जातात. या प्रवृत्तींमुळे लोकशाहीत प्रत्येक व्यक्तीला जसा मतदानाचा अधिकार असला तरी निवडणूक लढविण्याची समान संधी मात्र उपलब्ध होऊ शकत नाही. पैशाचा गैरवापर या समान संधीच्या आड येतो. तसे होऊ नये यासाठी जबाबदार समाजघटकांनी मतदारांचे प्रबोधन करण्यावर भर दिला पाहिजे, तर मतदारांनीही अशा प्रलोभनांना बळी न पडण्याचा निर्धार करायला हवा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांच्या वतीने गुरुवारी आयोजित एकदिवसीय चर्चासत्रापूर्वी निवडणूक विषयावर प्रबोधनात्मक काढण्यात आलेली रॅली.**

निवडणूक प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्यासाठी निवडणूक आयोग सातत्याने प्रयत्नशील आहे. कागदी मतपत्रिकांपासून सुरू झालेला मतदान प्रक्रियेचा प्रवास तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आपण ई. व्ही. एम. यंत्रांपर्यंत केला. आता त्यापुढे जाऊन व्ही. व्ही. पॅट यंत्रणेपर्यंत आपण पोहोचलो आहोत. पण, सक्षम लोकशाहीसाठी मतदारांनी स्वत:हून भ्रष्टाचार रोखण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. त्याचप्रमाणे अशा चर्चासत्रांच्या माध्यमातून यावर आपण काही तंत्रज्ञानात्मक उपाय देऊ शकू का, या विषयीही चिंतन होण्याची गरज असल्याचे मत चन्ने यांनी यावेळी व्यक्त केले.

डॉ. पाटील म्हणाल्या, विकसनशील देशांमध्ये केवळ भारत हा एकच देश असा आहे की जिथे लोकशाही टिकली. या लोकशाहीच्या सुदृढीकरणासाठी येथील निवडणूक प्रक्रियेकडे अधिक व्यापक पद्धतीने पाहणे गरजेचे आहे. राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. रवींद्र भणगे यांनी आभार मानले. दरम्यान विद्यापीठ प्रांगणातून निवडणूक प्रबोधन रॅली काढण्यात आली. श्री. चन्ने यांच्या हस्ते रॅलीचे उद्घाटन झाले. रॅलीत विद्यापीठातील तसेच महाविद्यालयीन राज्यशास्त्र अधिविभागातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग दर्शविला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 FEB 2018
Times of India

# Makeover: SUK changes names of seven courses

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** Shivaji University Kolhapur (SUK) has changed the nomenclature of its seven existing courses, in accordance with the University Grants Commission (UGC) guidelines.

According to the university officials, Bachelor of Food Technology and Management (BFTM), Bachelor of Computer Science (BCS), Master of Valuation, Bachelor of Dress Making and Fashion Coordination (BDFC), Bachelor of Multimedia (BMM), Bachelor of Journalism and Communication (BJC), and Master of Journalism and Communication (MJC) will see changes in names and faculty.

**Pro-vice chancellor D T Shirke told TOI that earlier, the degrees that the universities used to award were not uniform. Hence, the names and degrees used to differ. However, the UGC had asked all the universities to ensure they have uniform nomenclature**

The BFTM course will be called BSc (food technology and management), while BCS will be BSc (computer science). The BDFC course will be named BA (dress making and fashion coordination) and BMM will be BA (multimedia).

## NEW NOMENCLATURE

File photo

The Times of India



- Bachelor of Food Technology and Management (BFTM) will be called as BSc (Food Technology and management)
- Bachelor of Computer Science (BCS) will be called as BSc (Computer Science)
- Bachelor of Dress Making and Fashion Coordination (BDFC) degree will now be called BA (Dress making and fashion coordination)
- Bachelor of Multimedia (BMM) will be called BA (Multimedia)
- Bachelor of Journalism and Communication (BJC) will be called BJ
- Master of Journalism and Communication (MJC) will be called MJ

Pro-vice chancellor D T Shirke told TOI that earlier, the degrees that the universities used to award were not uniform. Hence, the names and degrees used to differ. However, the UGC had asked all the universities across the country to make sure they have uniform nomenclature for the courses.

"We had sent these changes to the UGC, but did not get a reply. Hence the vice-chancellor used the powers under the Maharashtra Public Universities Act, 2016, to change the nomenclature of the degree courses," he said.

Shirke said that students doing these courses will get their degrees according to the old nomenclature. "However, the students getting admitted from the academic year 2018-19 will see the changes getting reflected in the information brochures of colleges."

The existing students will be given the certificate of equivalence to make sure that no confusion prevails, he said, adding that the decision to implement these changes was taken last month.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 FEB 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठामध्ये उद्योजकता विकास कार्यक्रम

कोल्हापूर ( प्रतिनिधी) : शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्राच्या मध्यवर्ती प्लेसमेंट सेल आणि शिवाजी विद्यापीठ माजी विद्यार्थी संघटना यांच्या वतीने शुक्रवारी (दि. २३) सकाळी अकरा वाजता उद्योजगता विकास कार्यक्रम आयोजित केला आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहामध्ये कार्यक्रम होईल. उद्योजकतेमधील संधी, उद्योजकतेसाठी विविध सरकारी योजना यांची माहिती यावेळी दिली जाणार आहे. उद्योजकांशी संभाषणाची संधीही उपलब्ध होणार आहे. जास्तीत जास्त नवउद्योजकांनी या कार्यक्रमामध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन समन्वयक डॉ.ए.एम.गुरव यांनी केले आहे.

23 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स



## विद्यापीठात आज कार्यक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्र, मध्यवर्ती प्लेसमेंट सेल आणि शिवाजी विद्यापीठ माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (ता.२३) सकाळी अकरा वाजता उद्योजगता विकास कार्यक्रम आयोजित केला आहे. विद्यापीठाच्या शाहू सिनेट सभागृहामध्ये होणाऱ्या या कार्यक्रमात उद्योजकतेमधील संधी, विविध सरकारी योजनांची माहिती मिळणार आहे. जास्तीत जास्त नवउद्योजकांनी कार्यक्रमामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 FEB 2018
सकाळ



कोल्हापूर : कॉमर्स कॉलेजमध्ये झालेल्या चर्चासत्रात बोलताना डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी रजनीताई मगदूम, प्रसाद कामत, अॅड. व्ही. एन. पाटील, डॉ. व्ही. ए. पाटील, बी. जे. नेर्लेकर आदी.

# कॉमर्स कॉलेजमध्ये चर्चासत्र

कोल्हापूर, ता. २२ : येथील देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये 'उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र झाले. उच्च शिक्षणात गुणवत्तेशिवाय पर्याय नाही, असे मत या वेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे उपाध्यक्ष प्रसाद कामत यांनी शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी प्राध्यापकांना सांघिक कामाची गरज असल्याचे सांगितले. डॉ. एच. व्ही. देशपांडे, डॉ. आर. के. कामत, डॉ. एन. एच. जाधव, डॉ. आर. के. कामत यांनी मार्गदर्शन केले. संस्थेच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, अॅड. व्ही. एन. पाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, शहाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. नारायण उपस्थित होते. डॉ. टी. एस. झारी, प्रा. टी. ए. हिलगे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बी. जे. नेरलेकर, डॉ. ए. एस. बन्ने यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

# गुणवत्ता वाढीसाठी स्वप्नांचा पाठलाग करा

## डॉ. मोरे यांचे आवाहन; 'न्यू'मध्ये बक्षीस वितरण

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'नियोजनबद्ध परिश्रम, सातत्य आणि चिकाटी या गुणांचा विद्यार्थ्यांनी अंगीकार करुन आत्मनिर्भरपणे स्वप्नांचा पाठलाग केला पाहिजे. मात्र स्वप्न पाहताना त्याला प्रयत्नांची जोड देण्याची आवश्यकता आहे. प्रयत्नांतून व्यक्तिमत्त्व विकास घडून अचूक ध्येय गाठू शकाल,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे अॅकॅडमिक अॅडव्हायझर डॉ. डी. आर. मोरे यांनी व्यक्त केले. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाउस संचलित न्यू कॉलेजच्या वार्षिक गुणगौरव वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बोर्डिंगचे अध्यक्ष डी. बी. पाटील होते.

डॉ. मोरे म्हणाले, 'शिक्षणक्षेत्रात गुणवत्तेसाठी स्पर्धा होणे काळाची गरज असताना आज मात्र व्यावसायिक स्पर्धा जोमाने वाढीला लागली आहे. शिक्षणाच्या व्यापारीकरण ही चिंताजनक गोष्ट आहे. शिक्षणाचे व्यापारीकरण, खासगीकरण रोखण्यासाठी वेळीच शिक्षण चळवळी उभारणे आवश्यक आहे.'

अध्यक्षस्थानावरुन बोलताना पाटील म्हणाले, 'गुणवत्ता, आत्मनिर्भरता, विकास आणि बांधिलकी ही शिक्षणाची चतु:सूत्री आहे. विद्यार्थ्यांनी याचा अवलंब करावा. काही व्यक्ती कामाच्या मागे धावत असतात. काही व्यक्तींमागे काम धावत येत असते. असेच नोकरीच्या संधीही चालून येतील. त्यासाठी स्वत:तील गुणवत्ता वाढवावी लागेल. यश आणि अपयश या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याने त्याचा अधिक विचार करु नये.'

यावेळी बोर्डिंगचे संचालक ए. जी. वणिरे, प्राचार्य पी. के. पाटील, आर. बी. खोडवे यांच्यासह विद्यार्थी व पालक उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे यांनी केले. पारितोषक वितरण अहवालाचे वाचन प्रा. अमर सासने यांनी केले. धनंजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले. मराठी विभाग प्रमुख प्रा. जी. आर. पाटील यांनी आभार मानले.